पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४७ दिनांक -१९/०१/२०२४**

मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर

## खूनाचा प्रयत्न करुन गेल्या २ महीन्यांपासून फरार असलेल्या सराईत गुन्हेगाराला केले जेरबंद

मुंढवा पोलीस स्टेशन कडील गुन्हा रजिस्टर ३६७/२०२३ भा.द.वि कलम ३०७, ५०४, ५०६ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१)(३), १३५ सह आर्म ॲक्ट कलम ४(२५)सह क्रिमीनल लॉ अमेंडमेंट कलम ३, ७ प्रमाणे दाखल गुन्हयातील आरोपी नामे **अनुप ढगे वय २३ वर्षे, रा. झेड कॉर्नरजवळ, केशवनगर पुणे** हा गुन्हा दाखल झालेपासुन गेले दोन महिन्यापासुन स्वतःचे अस्तीत्व लपवुन फिरत होता. काल दिनांक १८/०१/२०२४ रोजी मुंढवा पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी वपोनी श्री महेश बोळकोटगी यांचे आदेशाने मुंढवा पोलीस ठाणे तपास पथक अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हददीत गुन्हे प्रतिबंध गस्त करीत असताना तपास पथकातील पोलीस अंमलदार महेश पाठक यांच्या गुप्त बातमीदारामार्फतीने बातमी मिळाली की, आरोपी अनुप ढगे हा उरुळी कांचन पुणे या ठिकाणी येणार आहे.

सदरची माहीती तात्काळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बोळकोटगी यांना कळविली.त्यांनी लगेचच तपास पथकातील अधिकारी सपोनि संदिप जोरे यांना स्टाफसह बातमी ठिकाणी जावून आरोपी ताब्यात घेण्याचे आदेश दिले.सपोनी जोरे व स्टाफ यांनी मिळालेल्या बातमी प्रमाणे अत्यंत शिताफिने वरील आरोपी नामे अनुप ढगे वय २३ वर्षे,रा.झेड कॉर्नरजवळ,केशवनगर पुणे यास उरुळीकांचन येथील पीएमटी बस स्टॅन्ड येथे सापळा रचुन ताब्यात घेवुन आरोपीस दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशीक विभाग पुणे शहर, श्री. रंजनकुमार शर्मा मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ५ पुणे शहर, श्री. आर.राजा,मा.सहा.पोलीस आयुक्त हडपसर विभाग पुणे शहर.श्रीमती अश्विनी राख मॅडम, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंढवा पोलीस ठाणे पुणे श्री.महेश बोळकोटगी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती संगिता रोकडे, तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक संदिप जोरे, दिनेश राणे, संतोष काळे, दिनेश भांदुर्गे संतोष जगताप,महेश पाठक,झुरंगे,स्वप्नील रासकर,हेमंत पेरणे,सचिन पाटील यांनी केली आहे.